महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल

## डॉ. पा. व. चेरियन्

यांचे

# अभिभाषण

१० मार्च १९६९

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

अध्यक्ष महोदय, सभापती महोदय आणि माननीय सदस्य,

महाराष्ट्र विधानमंडळाच्या संयुक्त अधिवेशनासमोर पुन्हा एकदा बोलण्याची संधी मिळाली याबद्दल मला अतिशय आनंद होत आहे. शासनाने जाहीर केलेली धोरणे व कार्यक्रम यांचे बाबतीत किती प्रगती झाली आणि येत्या वर्षासाठी काय उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे हे आपणासमोर मांडण्याची आणखी एक संधी यामुळे शासनाला मिळाली आहे.

२. यंदा पाऊस आणि हवामान अनिश्चितच होते. तरीसुद्धा राज्याचे खरीप हंगामातील अन्नधान्याचे एकंदर उत्पादन गेल्या वर्षापेक्षा अधिक चांगले असण्याची शक्यता आहे हे सांगायला मला आनंद वाटतो. अधिक उत्पन्न देणाऱ्या अन्नधान्याची लागवड हे याचे विशेष कारण आहे. माझे शासन अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याकरिता जे सतत प्रयत्न करीत असते याचे निश्चित परिणाम आता दिसू लागले आहेत हे यावरून स्पष्ट होते. नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांत पुरेसा पाऊस न पडल्यामुळे रबीचे पीक मात्र गेल्यावर्षाप्रमाणे समाधानकारक हाती येईलसे दिसत नाही.

३. सार्वजनिक धान्यवाटपासाठी आवश्यक असणारा धान्यसाठा सध्या शासनापाशी पुरेसा आहे. तांदूळ आणि ज्वारीची वसुली गेल्यावर्षापेक्षा यंदा अधिक होईल असा अंदाज आहे. सार्वजनिक धान्यवाटपावरील भारही थोडा कमी झाला आहे. या घटना आशादायक आहेत.

४. सर्वसाधारण किंमतीच्या निर्देशांकात अन्नधान्याच्या किंमतींना महत्त्वाचे स्थान आहे. अन्नधान्याचे भाव यावर्षी जवळ जवळ स्थिर होते. इतकेच नाही तर काही बाबतीत ते उतरले देखील. जीवनावश्यक वस्तूंचे भाव अवास्तव चढतात असे दिसल्याबरोबर ते स्थिर करण्यासाठी शासनाने लागलीच योग्य ते उपाय योजले आहेत.

५. अन्नधान्याच्या अधिक उत्पादनासाठी खात्रीचा पाणीपुरवठा ही एक मुख्य बाब आहे. यासाठी जलसिंचनाच्या निरनिराळ्या प्रकारच्या योजना पुऱ्या करण्याकरिता शासनाकडून नेटाने प्रयत्न करण्यात आले ही समाधानाची गोष्ट आहे. चालू साली, मोठ्या व मध्यम जलसिंचन योजनांमुळे एक लाख अठ्ठावन्न हजार एकर जमीन भिजविण्याची शक्यता आपण निर्माण करू शकू अशी अपेक्षा आहे. छोट्या जलसिंचन योजनांवरील खर्चाला मंजुरी देतानासुद्धा सरकारने अधिक उदार धोरण ठेवले आहे. त्यामुळे १० हजार एकर जमिनीला फायदा होईल अशी अपेक्षा आहे.

६. जलसिंचन प्रकल्पासंबंधी पुढील धोरण ठरविण्यासाठी आणि आजवर या बाबतीत झालेल्या प्रगतीचा काटेकोर आढावा घेण्यासाठी शासनाने यावर्षी एक अभ्यास मंडळ नेमले आहे. हे मंडळ येत्या दहा-पंधरा वर्षासाठी एक यथार्थ कार्यक्रम आखणार आहे. राज्याच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळे पाटबंधारे कायदे अस्तित्वात असल्यामुळे निष्कारण अडचणी निर्माण होतात. त्यावर उपाय म्हणून हे सर्व कायदे एकत्र करून सबंध राज्याकरिता एक नवीन पाटबंधारे कायदा बनविण्याचे सरकारने ठरविले आहे. यासाठी आवश्यक ते विधेयक सन्मान्य सभागृहासमोर योग्य वेळी मांडण्यात येईल.

७. राज्यातील काही संमिश्र जंगल विभागांचा विशेष विकास करण्याचा शासनाचा विचार आहे. या विभागांचा कमीत कमी वेळात विकास व्हावा व त्यापासून जास्त उत्पन्न मिळावे यासाठी शासनाने एक जंगल विकास मंडळ नेमले आहे.

८. चालू साली राज्यभर व विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात अपुरा पाऊस पडल्यामुळे, जलविद्युत केन्द्रांना पाणी पुरविणारे तलाव नेहमीप्रमाणे भरले नाहीत. त्यामुळे गेल्या नोव्हेंबरपासून राज्याच्या पश्चिम भागात विजेच्या वापरावर निर्बन्ध घालणे शासनाला नाइलाजाने भाग पडले. तथापि, आवश्यक उद्योगधंदे आणि शेती यासाठी लागणारी वीज मात्र त्यातून वगळण्यात आली आहे. मध्यप्रदेश आणि म्हैसूर या शेजारच्या राज्यांतून वीज मिळविण्याच्या कामालाही शासनाने अग्रहक्क दिला आहे. तारापुरच्या अणुविद्युत् केंद्रातील वीज घेण्याची आणि वाहून नेण्याची सर्व व्यवस्था पूर्ण झाली असून, वीज येण्याचाच काय तो विलंब आहे.

९. कोयना धरण बळकट करण्यासाठी तज्ज्ञांच्या कमिटीने ताबडतोबीच्या दुरुस्तीसंबंधी केलेल्या शिफारशी अमलात आणल्या आहेत. धरणाच्या कायम बळकटीसाठी ज्या शिफारशी कमिटीने केल्या त्यासुद्धा त्वरित अमलात आणण्याचे दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. १९७१ च्या पावसाळ्यापूर्वी हे काम संपेल अशी अपेक्षा आहे.

१०. प्रत्येक खेड्याला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी याची शासनाला जाणीव आहे. यासाठी ९,८९२ विहिरी बांधण्यात आल्या. आणि ९,०२९ अधिक विहिरी बांधल्या जात आहेत. नळांच्या सहाय्याने पाणी पुरविण्याच्या योजनांचे कामही वेगाने चालू आहे. त्याचबरोबर शक्य तितक्या म्युनिसिपल विभागांत सुरक्षित पाणीपुरवठा सुरू करण्याचेही शासनाने ठरविले आहे. यासाठी "क" वर्गाच्या नगरपालिकांना देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीचे प्रमाण बरेच वाढविण्यात आले आहे. "अ" आणि "ब" वर्गाच्या नगरपालिकांना या योजनांसाठी उचलावा लागणारा खर्चाचा वाटा त्यांनी तीन समान हप्त्यांनी द्यावा अशी सवलत त्यांना देण्यात आली आहे. नुकतीच शासनाने १६ म्युनिसिपल पाणीपुरवठा योजनांना मान्यता दिली असून त्यापैकी ८ योजना नव्या आहेत.

महामुंबईतील सदैव वाढती पाणी-टंचाई दूर करणे ही एक तातडीची आणि आवश्यक बाब होऊन बसली आहे. याकरिता मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने अपर वैतरणा योजना आणि त्याचबरोबर भातसई योजना त्वरेने पूर्ण करण्याचा शासन सर्व तऱ्हेने प्रयत्न करीत आहे. जागतिक बँकेशी संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय विकास संघटनेने पण याबाबतीत विशेष उत्साह दाखविला आहे. अपर वैतरणा आणि भातसई अशी संयुक्त योजना हाती घेण्यासाठी या संघटनेकडून आवश्यक आर्थिक मदत मिळविण्याकरिता वाटाघाटी चालू आहेत. या वाटाघाटी लवकरच सफल होतील अशी शासनाला आशा आहे. वारवी योजनेचे कामही ठरविलेल्या वेळापत्रकाप्रमाणे चालू आहे.

११. महामुंबईत सरकारी, म्युनिसिपल व खाजगी जमिनीवर झालेल्या अतिक्रमणामुळे जे अनेक प्रश्न उद्‌भवले आहेत त्यांचीही शासनाला जाणीव आहे. या अतिक्रमणामुळे ज्या आरोग्य-विघातक आणि गलिच्छ वस्त्या तयार झाल्या आहेत त्यामुळे या महानगरीला काळिमा लागला आहे.

यापैकी ज्या जागा सार्वजनिक कामासाठी तावडतोब हव्या आहेत त्या जागांवरील झोपडपट्ट्या काढून टाकण्याचे शासनाने ठरविले आहे. १७ एप्रिल १९६४ पूर्वीपासून अशा तऱ्हेने अतिक्रमण करून राहिलेल्या व उदर निर्वाहाची साधने असलेल्या वन्याचशा झोपडीवाल्यांना पुढील पावसाळ्यानंतर लगेच नव्या जागी हालविण्यात येण्याची शक्यता आहे. खाजगी जमिनी किंवा खाजगी कंपन्या अगर संस्था यांना लागणाऱ्या जमिनीवरील अतिक्रमणही दूर करता येईल. परंतु तिथल्या रहिवाशांसाठी नवीन वस्त्या तयार करण्याकरिता आणि त्यांना तिकडे हालविण्याकरिता जो खर्च येईल त्याचा योग्य तो वाटा जमीनमालकांना उचलावा लागेल.

१२. या राज्याने मुंबई-पुणे रस्त्यावरील पनवेल-पुणे विभागासाठी संपूर्ण नवा मार्ग सुचविला असून ही सूचना केंद्र सरकारच्या विचाराधीन आहे. मुंबई-पुणे व मुंबई-आग्रा रस्त्यांमधील काही भागांच्या खास दुरुस्तीसाठी केंद्र सरकारने जादा रकमा मंजूर केल्या त्याबद्दल राज्य शासन केंद्र सरकारचे आभारी आहे. दुरुस्तीच्या कामाला सुरुवात झाली असून कामाची प्रगती समाधानकारक आहे. सागरी दळणवळणाचे क्षेत्रात, दाभोळ बंदराच्या धक्क्याचे काम आणि जयगड येथील धक्का आणि प्रवेश मार्ग ही कामे पुरी झाली आहेत. एक ५०० टनी ड्रेजर घेण्याचेही नक्की ठरले आहे. किनारपट्टीच्या भागातील गाळ काढण्याचे कामास याची मदत होईल.

१३. वैद्यकशास्त्राचे विद्यार्थ्यांना शिक्षणक्रमाचा भाग म्हणून एक वर्षभर कोणत्याही एका हॉस्पिटलमध्ये काम करावेच लागत असते. हे काम त्यांनी आता जिल्हा पातळीवरील निवडक हॉस्पिटलात आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांत करावे अशी एक योजना शासनाने बनविली आहे. या योजनेमुळे या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव तर मिळेलच पण त्याचबरोबर खेड्यापाड्यातही वैद्यकीय मदत उपलब्ध होऊ शकेल.

१४. कुटुंब नियोजनाच्या क्षेत्रात गेल्या एकाच वर्षी निर्बीजीकरणाच्या जितक्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या तितक्या त्यापूर्वीच्या दहा वर्षांत देखील झाल्या नव्हत्या. जनतेचे सहकार्य लाभावे म्हणून कुटुंब नियोजनाच्या कार्याला शक्य त्या सर्व प्रचार साधनांनी भरपूर प्रसिद्धी दिली जाते. त्यामुळे कार्याचा वेग चालू सालीसुद्धा कमी झालेला नसून सध्याचे दर हजारी ३८ हे जन्मप्रमाण १९७६ सालापर्यन्त दर हजारी २५ वर आणण्याचे आपले उद्दिष्ट गाठणे शक्य होईल.

१५. आपल्या मनाला अस्वस्थ करणाऱ्या काही गोष्टींसंबंधीची संपूर्ण माहिती शासन आपल्याला वेळोवेळी देत आले आहेच. कृष्णा आणि गोदावरीच्या पाण्याचा योग्य वाटा राज्याला मिळण्याचा प्रश्न ही अशीच एक बाब आहे. सर्व संबंधित राज्यांना फायदेशीर ठरेल अशा कोणत्याही संयुक्तिक तत्त्वाने हा तंटा सुटत नाही हे दिसताच तो एखाद्या न्यायाधिकरण लवादाकडे सोपविला जावा अशी सूचना राज्य सरकारने केन्द्राला केली आहे. ही यंत्रणा शक्य तितक्या लवकर उभारली जावी म्हणून राज्य शासनाने आग्रह धरला आहे. शिवाय कृष्णा आणि गोदावरी नद्यांचे प्रश्न परस्परांशी निगडित असल्यामुळे त्यांचा एकत्र विचार व्हावा व त्यासाठी लवाद म्हणून एकच न्यायाधिकरण नेमण्यात यावे हा दृष्टिकोन केंद्रासमोर आग्रहपूर्वक ठेवण्यात आला आहे.

१६. महाराष्ट्र-म्हैसूर सीमावाद हा असाच दुसरा प्रश्न आहे. वादग्रस्त विभागातील जनतेला संसद आणि केंद्र सरकार न्याय देईल या खात्रीचा माझे शासन पुनरुच्चार करीत आहे. मात्र हा

प्रश्न केंद्र सरकारात बराच काळ रेंगाळत पडल्यामुळे तो अधिकच बिकट होत आहे आणि त्याचे संभाव्य दुष्परिणाम टाळले जाणे आवश्यक आहे हे केंद्राच्या निदर्शनास आणून देणे शासन आपले कर्तव्य समजते.

१७. वास्तविक चालू अधिवेशनात आपल्यासमोर वार्षिक अंदाजपत्रक सादर व्हावयाला हवे होते. परंतु चौथी पंचवार्षिक योजना अद्याप संपूर्ण तयार झाली नसल्याने तसे करणे शक्य झाले नाही. त्यामुळे पुढील चार महिन्यांचा खर्च करण्याकरिता शासनाला अधिकार मिळण्यासाठी, चालू अधिवेशनात एक लेखा परिदान ( Vote on Account ) मांडण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पुढील विधेयकेही या अधिवेशनात मांडण्यात येणार आहेत.--

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक (सन १९६९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ याचे रूपांतर).

(1) The Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Bill (Conversion of Maharashtra Ordinance No. II of 1969).

(२) मुंबई नगर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक (नगर दिवाणी न्यायालयाच्या आर्थिक अधिकारितेसंबंधातील उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या दृष्टीने कलम ३ ची सुधारणा करण्यासाठी).

(2) A Bill to amend the Bombay City Civil Court Act, 1948 (to amend section 3 in view of the High Court Judgment about pecuniary jurisdiction of the City Civil Court).

(३) भारतीय घटस्फोट अधिनियमात सुधारणा करण्यासाठी विधेयक.

(3) A Bill to amend the Indian Divorce Act.

(४) मुंबई विक्रीकर (सुधारणा) विधेयक, १९६९.

(4) The Bombay Sales Tax (Amendment) Bill, 1969.

(५) मुंबई मंत्र्यांचे पगार व भत्ते (सुधारणा) विधेयक (आतिथ्य भत्त्याची विद्यमान आर्थिक मर्यादा वाढविण्यासाठी).

(5) The Bombay Ministers' Salaries and Allowances (Amendment) Bill. (To enhance the present monetary limit of the sumptuary allowance).

(६) मुंबई महानगरपालिका अधिनियमात सुधारणा करण्यासाठी विधेयक (मालकीच्या तत्त्वावर बांधलेल्या वैयक्तिक सदनिकांवर (फ्लॅट) कर आकारणी व वसुली यांची तरतूद करण्यासाठी).

(6) A Bill to amend the Bombay Municipal Corporation Act. (To provide for assessment and levy of tax on individual flats constructed on ownership basis).

(७) प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात सुधारणा करण्यासाठी विधेयक (महानगरपालिकेच्या जागांमधून व्यक्तींना निष्कासित करण्याची शक्ती).

(7) A Bill to amend the Provincial Municipal Corporations Act. (Power to evict persons from Corporation premises).

(८) मुंबई गृहनिर्माण मंडळ अधिनियम, १९४८ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.

(8) A Bill to amend the Bombay Housing Board Act, 1948.

(९) महाराष्ट्र राज्य पाणी दूषित होण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक.

(9) The Maharashtra State Prevention of Water Pollution Bill.

(१०) मुंबई निवारण उपक्रम (खास उपबंध) अधिनियम, १९५८ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक (अधिनियमाच्या अनुसूचीत, कामगार भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९५८ व लाभांश देण्याबाबत अधिनियम, १९६५ यांची नावे अंतर्भूत करण्यासाठी).

(10) A Bill to amend the Bombay Relief undertakings (Special Provisions) Act, 1958. (To include the names of Employees Provident Fund Act, 1958 and payment of Bonus Act, 1965 in the Schedule of the Act).

(११) महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक [अध्यक्ष व तीन विभागीय मंडळांचे विभागीय अध्यक्ष यांचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी त्यांची बदली, नियत सेवावधी यांची तरतूद करण्याच्या प्रयोजनार्थ कलम ७(एक) ची सुधारणा करणे].

(11) A Bill to amend the Maharashtra Secondary Education Boards Act, 1965. (To amend section 7 (i) for the purpose of provision of transfer, superannuation of the Chairman and Divisional Chairman of the three Divisional Boards before their term expires).

(१२) मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.

(12) A Bill to amend the Bombay Motor Vehicles Tax Act, 1958.

(१३) महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक.

(13) The Maharashtra Co-operative Societies (Amendment) Bill.

(१४) मुंबई शहरातील इनाम व विशेष इनाम नाहीसे करण्यासाठी विधेयक.

(14) A Bill for the abolition of Inams and Special Inams in the Bombay City.

(१५) अनुसूचित जमातीच्या सदस्यांच्या मालकीच्या जमिनींवरील झाडे तोडण्याचे नियमन करण्यासाठी विधेयके.

(15) A Bill to regulate the felling of trees on lands belonging to members of Scheduled Tribes.

१८. राष्ट्रपिता महात्मा गांधींची जन्मशताब्दी आपण यंदा साजरी करणार आहोत या गोष्टीचा निर्देश मला करावासा वाटतो. गांधीजींची स्मृती अखंड तेवत ठेवण्यासाठी त्यांच्या तत्त्वांचे आचरण हाच सर्व श्रेष्ठ मार्ग आहे. सारे प्रश्न, हिंसाचार न करता सोडविले जावेत हे यापैकी एक तत्त्व आहे. लोकशाहीच्या चौकटीत बसेल अशा पद्धतीने आपापल्या कार्यक्रमासाठी चळवळ करण्याचा अधिकार भारतीय घटनेने प्रत्येक नागरिकाला आणि पक्षाला दिलेला आहे. परंतु

कोणताही प्रश्न रस्त्यावर सोडविण्याचा प्रयत्न केल्याने काहीही साध्य होत नाही. अशा उपायांचा अवलंब करणारी, शिवसेना ही महामुंबईतील एक स्थानिक संस्था असून, तिच्या फॅसिस्ट कार्यपद्धतींना राज्य शासनाचा संपूर्ण विरोध आहे. गेल्या महिन्यात महामुंबईत झालेली दंगल, जाळपोळ आणि लुटालुट यांचा, माझे शासन निःसंदिग्ध शब्दांत धिक्कार करीत आहे. या राज्यातील जनता लोकशाही तत्त्वांना खंबीरपणे चिकटून राहील आणि कोणाही व्यक्तीला अगर संस्थेला आपल्या स्वार्थासाठी या राज्याच्या उज्ज्वल नावलौकिकाला काळिमा लावू देणार नाही याची शासनाला खात्री आहे. त्याचबरोबर जाती, पंथ अगर भाषा यांचा विचार न करता राज्यातील प्रत्येक नागरिकाला संरक्षण मिळावे व त्याचेवर कोणताही अत्याचार, हिंसाचार होऊ नये अगर त्याची मानहानी होऊ नये यासाठी राज्य शासन सर्व सत्तेनिशी त्याचे पाठीशी उभे राहील हे मी स्पष्ट करू इच्छितो. या कार्यात सन्मान्य सभासदांचे व इतर जनतेचे मनापासून व संपूर्ण सहकार्य मिळेल अशी माझ्या शासनाची खात्री आहे.

१९. चालू अधिवेशनातील चर्चा सत्राला आता आपण सुरुवात करीत आहात. आपल्या कार्याला मी सुयश चिंतितो.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.